# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था )

विद्यानगर, राजाराम कॉलेज जवळ, कोल्हापूर , पिन कोड- ४१६००४

फोननंबर-(०२३१)–२५२१०३८ वेबसाइट- www.gpkolhapur.org.in


जा.क्र.शातंनिको/पवि/२०२३/ ७७४ दि. १५/७/२०२३

## विषय :- नियमित विद्यार्थ्यांसाठी विषय नोंदणी व परीक्षा अर्ज भरणे बाबत .... (R, R+RR )

सर्व नियमित विद्यार्थ्यांना कळविणेत येते की,विषम सत्र २०२३-२४ (हिवाळी २०२३) च्या विषयांची विषय नोंदणी व परीक्षा अर्ज खाली दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे भरावयाचा आहे.

| Date | Programme |
|---|---|
| 17/7/2023 to 20/7/2023 | All Programmes |

1)नियमीत (R) परीक्षा विद्यार्थ्यासाठी ९०० रूपये

[(सत्र परिक्षा -७००रु. +चाचणी परिक्षा २००रु. ) जादा R २०० रु. प्रति विषय ]

2)नियमीत (R+4RR) विद्यार्थ्यासाठी १७०० रूपये

[९००रु.+4RRपर्यंत ८००रु. (२०० रु. प्रति RR विषय)]

3) 4RR च्या पुढे प्रत्येक विषयासाठी रु. १५०/- प्रति विषय

१) विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचा आहे. त्यासाठी प्रथमता विद्यार्थ्यांनी संस्थेच्या सांकेतीक स्थळावर (www.gpkolhapur.org.in) त्यांचे माहिती पत्रक (E-Registration) बिनचुक भरणे आवश्यक आहे. माहितीपत्रकामध्ये फोटो, ई-मेल ॲड्रेस, मोबाईल नंबर ची माहिती काळजीपूर्वक वाचून गरज असल्यास दुरुस्त करून घ्यावी. प्रत्येक विद्यार्थ्याने स्वतःचाच मोबाईल नंबर व ई-मेल आयडी भरावा जेणेकरुन संगणक प्रणालीचा वापर विद्यार्थी वैयक्तीकपणे करू शकतील. विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधित व इतर कार्यालयीन कामकाजाकरीता माहिती पत्रकामध्ये नोंदणी केलेल्या या मोबाईल नंबर व ई-मेल आयडी व्दारे सुचना देणेत येतील.

२) आपला पासवर्ड विद्यार्थ्यांनी गोपनिय ठेवावा तसेच तो विसरणार नाही याची दक्षता घ्यावी. पासवर्ड विसरलेस रु.१००/- इतके शुल्क भरून पासवर्ड घेता येईल.

३) सर्व विद्यार्थ्यांनी विषम सत्र २०२३-२४ विषय नोंदणी ,पुनः नोंदणी संबंधी आपल्या विभागातील नोंदणी अधिकारी / वर्गशिक्षक यांच्याशी संपर्क साधून योग्य ते मार्गदर्शन घ्यावे व नंतर ऑनलाईन अर्ज भरावा. Detain झालेल्या विषयांची नोंदणी पुन्हा R म्हणून करुन विद्यार्थ्यांने त्याचे सत्र कर्म पूर्ण करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

४) एकदा विषय नोंदणी/ परीक्षा अर्ज विद्यार्थ्यांने ऑनलाईन Save केल्यानंतर त्यात बदल करता येणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत विषय नोंदणी अधिकारी / वर्ग-शिक्षक यांचे कडुन बदल करून घ्यावा व तदनुसार केलेल्या बदलाची खात्री करून सुधारीत प्रत जवळ ठेवावी.

५) विषय नोंदणी व परीक्षा अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरलेनंतर विषयनोंदणी /परीक्षा अर्जाची छापील प्रत घेऊन शैक्षणिक व इतर फी ऑनलाईन पद्धतीने आकारणेसाठी विद्यार्थी विभागाशी आवश्यकता असल्यास संपर्क साधावा. विद्यार्थी विभागाने आकारलेले शैक्षणिक शुल्क, इतर फी व परीक्षा फी ऑनलाईन पध्दतीने एकत्रीत भरावी. फी पावतीची छापील प्रत घ्यावी. या पावतीची दुय्यम प्रत व विषयनोंदणी अर्ज विभागातील विषय नोंदणी अधिकारी यांच्याकडे कायम करणेसाठी (confirm ) जमा करावे. विषय नोंदणी अधिकारी दि.१८/७/२०२३ ते २१/७/२०२३ या कालावधीत अर्ज कायम (confirm) करतील.

६) विद्यार्थी विभागाकडून मार्क केलेली फी भरणे बंधनकारक आहे.

विषय नोंदणी अधिकार्यांनी अर्ज कायम केल्याशिवाय विद्यार्थ्यांना परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

- अर्ज भरताना काही तांत्रिक अडचण आल्यास परीक्षा विभागामध्ये संपर्क साधावा.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन ,कोल्हापूर

प्रत:-

१. सर्व नोटीस बोर्डवर जाहीर..
२. रोखपाल व विद्यार्थी विभाग यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
३. सर्व विभागाना जाहीर करणेसाठी
४. संस्थेच्या वेबसाईटवर